सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

8/6/21

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००३२७९**

**अपिलार्थी श्री. इहतेश्याम कुतुबुद्दीन सिद्दीकी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
भोईवाडा विभाग, वीर श्रीकांत हडकर मार्ग, काळाचौकी,
मुंबई - ४०० ०३३

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त (परि-४)**
माटुंगा पोलीस ठाणे, पहिला मजला, डॉ. बी.ए. रोड
महेश्वरी उद्यान, (किंग सर्कल), मुंबई - १९.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २०.०४.२०२१</u>**

अपीलकर्ता : व्ही.सी.माध्यमाव्दारेउपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : व्ही.सी.माध्यमाव्दारेउपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०४.०३.२०१९ | ०२.०४.२०१९ | २९.०४.२०१९ | [illegible] |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १३.०७.२०१९ रोजीच्या अर्जान्वये व्दितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीच्या वेळी दोन्ही पक्षांचे मत जाणून घेतले. दोन्ही पक्षाने त्यांचे लेखी युक्तिवाद सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करुन सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

## आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०८.०६.२०२१ रोजी दुपारी २.२० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २२.०४.२०२१**

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

ISSUED
Date 27 APR 2021
Signature

State Inform

**अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००३२७९**
**अपिलार्थी श्री. इहतेश्याम कुतुबुद्दीन सिद्दीकी**
**सुनावणी दिनांक : ०८.०६.२०२१ (In continuation of order dt २२.०४.२०२१)**

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १३.०७.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपिलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी व जन माहिती अधिकारी व्ही. सी. माध्यमाद्वारे उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. ०४.०३.२०१९ अन्वये वर्ष २००१ ते २००४ पर्यंत भोईवाडा विभागांतर्गत सी.आर. /एल.एस.सी नंबर व कोर्ट केस नंबर ज्यामध्ये तपासानंतर अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात दाखल झालेले आहेत त्या संबंधीची माहिती विचारली आहे.

आजचे सुनावणीचे वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तथापि, प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. या आयोगासमोर द्वितीय अपील अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम कलम १९ (३) अंतर्गत दाखल करण्यात येत आहे. व द्वितीय अपील प्रथम अपिलाच्या आदेशाविरुध्द करण्याची तरतूद आहे. या कारणामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे.

या प्रकरणा मध्ये जी माहिती विचारण्यात आली आहे त्या प्रकारची माहिती अपिलार्थी यांनी या अगोदरही इतर पोलीस विभागातून विचारलेली होती. त्यांचे प्रकरण क्रमांक ५०८४/२०१८, १९५२/२०१८, ३२९२/२०१८ असे आहेत.

या प्रकरणावर पुढील सुनावणी ०३ ऑगष्ट २०२१ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल. त्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक राहील व कार्यालयद्वारा वरील तिनही प्रकरणाचे संबंधित कागदपत्रं सुनावणीचे वेळी आयोगासमोर उपलब्ध करुन द्यावेत.

State Information Commission Greater Mumbai

सुनील पोरवाल

**मुंबई**
**दिनांक : १६.०६.२०२१**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००३२७९**
**अपिलार्थी श्री. इहतेश्याम कुतुबुद्दीन सिद्दीकी**
**सुनावणी दिनांक : ०६.११.२०२४ (In continuation of order dt १६.०६.२०२१)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | व्ही. सी. माध्यमाद्वारे उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | प्रतिनिधी उपस्थित |

या प्रकरणी आयोगाने दिनांक १६.०६.२०२१ रोजी खालीलप्रमाणे आदेशीत केले होते:

"या प्रकरणामध्ये जी माहिती विचारण्यात आली आहे त्या प्रकारची माहिती अपिलार्थी यांनी या अगोदरही इतर पोलीस विभागातून विचारलेली होती. त्यांचे प्रकरण क्रमांक ५०८४/२०१८, १९५२/२०१८ , ३२९२/२०१८ असे आहेत. या प्रकरणी पुढील सुनावणीचे वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक राहील व कार्यालयद्वारा वरील तिनही प्रकरणांचे संबंधित कागदपत्रं सुनावणीचे वेळी आयोगासमोर उपलब्ध करुन द्यावेत."

उक्त आदेशान्वये या प्रकरणी आज सुनावणी ठेवण्यात आलेली आहेत. आजच्या सुनावणीस अपिलार्थी व्ही. सी. माध्यमाद्वारे उपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित आहेत.

मागील सुनावणीनंतर अपिलार्थी यांनी त्यांचे दि. ११.०७.२०२१ चे लेखी निवेदन आयोगास सादर केले आहे व त्यासोबत मा. उच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दि. १० जून, २०२१ रोजी दिलेल्या निकालाची प्रत सादर केली. तसेच त्यांनी केंद्रीय माहिती आयोगाचे निर्णय क्र. CIC/SG/A/२०११/००२३३४/१५७०७ दि. १६.११.२०११ मध्ये दिलेल्या निकालाची प्रतही संलग्न केली आहे.

अपिलार्थी यांनी मा. उच्च न्यायालय, नवी दिल्लीच्या निकालाचा उल्लेख करुन सदर विषय मानवी हक्काशी संबंधीत असल्याने त्यांना माहिती मिळाली पाहिजे, असा युक्तिवाद केला. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, वर्ष २००१ ते २००४ चे दरम्यान ज्याची माहिती अपिलार्थी यांनी मागितलेली आहे त्या कालावधीमध्ये सुमारे १००० पेक्षा जास्त गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत आणि L.A.C.( Local Act Crime) ची माहिती जास्त कालावधीकरीता ठेवण्यात येत नाही. तसेच काही प्रकरणामध्ये कोर्ट केस नंबरची माहिती संबंधित न्यायालयाकडून प्राप्त करुन घ्यावी लागणार आहे.

अपिलार्थी यांनी आयोगास विनंती केली की त्यांना वर्ष २००१ ते २००४ पर्यंतच्या कालावधी दरम्यान ज्या गुन्हयामध्ये श्री. अरुन खानविलकर हे तपास अधिकारी होते त्या गुन्ह्यांचा सी.आर नंबर व कोर्ट केस नंबर (उपलब्ध असल्यास) त्याची माहिती मिळावी.

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकारे माहिती उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले परंतू निवडणुकीचे कामामध्ये कर्मचारी व्यस्त असल्याने त्यांनी काही कालावधीची मागणी केली

जन माहिती अधिकारी यांनी वरील प्रमाणे माहिती १५, डिसेंबर, २०२४ पर्यत अपिलार्थी यांना नि:शुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनाप्रमाणे कार्यवाही करावी.**

**२. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०७.११.२०२४**

State Information Commission * Greater Mumbai * सत्यमेव जयते

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ